(१५४)

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. मआ/उआ/से/ ८७७
दिनांक : ५-६-२०१०

## कार्यालयीन आदेश

विषय : माहिती अधिकार अधिनियम २००५
द्वितीय अपील सुनावणी प्रकरणी घ्यावयाची दक्षता.

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दाखल झालेल्या तक्रार अर्जावरील द्वितीय सुनावणी मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांचे कार्यालयात वेळोवेळी आयोजित करण्यात येते. या सुनावणीची पत्रे प्राप्त झालेनंतरही काही जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलिय अधिकारी राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयामधील सुनावणीस उपस्थित राहत नाहीत, सुनावणीचे विहीत वेळी व आवश्यक त्या माहितीसह उपस्थित राहत नाहीत, इत्यादी बाबी निदर्शनास आल्या आहेत.

सबब, सर्व जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी द्वितीय सुनावणीचे विहीत दिवशी, विहीत वेळेमध्ये राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ यांचे कार्यालयात न चुकता उपस्थित राहवे. तसेच सुनावणी दरम्यान मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग यांनी दिलेल्या सुचनांची काटेकोर अंमलबजावणी करावी.

वरील कार्यवाहीत कुचराई झाल्यास संबधित जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत:
सर्व जन माहिती अधिकारी आणि
प्रथम अपिलीय अधिकारी
पुणे महानगरपालिका
यांजकडेस पुढील कार्यवाहीसाठी......

कर आकारणी व कर संकलन कार्यालय
पुणे महानगरपालिका
आवक क्रमांक:-७१३५२
दिनांक:- ०५।६।१०

All AA+C & Steno
सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.
५।६।१०

उप आयुक्त तथा
कर आकारणी व कर संकलन प्रमुख
पुणे महानगरपालिका